# ग्रंथालय विस्तारित अभ्यासिका खुली

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाची विस्तारित अभ्यासिका विविध अभ्यासक्रमांना नियमित प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात येत आली आहे. विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या नोंदणीकृत विद्यार्थ्यांनाच अभ्यासिकेत प्रवेश देण्यात येणार आहे. प्राथमिक टप्प्यात सकाळी १०.३० ते ६ या वेळेत विद्यार्थ्यांना अभ्यासाला बसता येईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सोबत ओळखपत्र असणे आवश्यक आहे. ओळखपत्र अद्याप प्राप्त झाले नसल्यास चालू वर्षाच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतल्याची, फी भरल्याची पावती दाखवून त्यांना अभ्यासिकेत बसता येईल. दरम्यान, आज सकाळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी नूतन अभ्यासिका, बैठक व्यवस्थेची पाहणी केली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, बीसीयुडी संचालक डॉ. डी.आर. मोरे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी एन.व्ही. कोंगळे, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, उपग्रंथपाल डॉ. डी.बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी.बी. बिलावर यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.